RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १७१] गुरुवार, नोव्हेंबर १२, २०२६/कार्तिक २१, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ६१५

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ नोव्हेंबर, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.

क्रमांक मुवक-२०२६/प्र.क्र.२८/कराधान-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ९ च्या उप कलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक मूवक. २०२६/प्र.क्र.२८/कराधान-१, दिनांक १४ मे २०२६ अन्वये, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची 'ख' मध्ये सुधारणा केली आहे आणि दिनांक १५ मे २०२६ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी विमान टर्बाइन इंधनावरील (शुल्क भरलेल्या) कराचा दर सात टक्के इतका कमी केला आहे ;

आणि ज्याअर्थी, विमान टर्बाइन इंधनावरील (शुल्क भरलेल्या) उक्त कराचा दर दिनांक १४ एप्रिल २०२७ पर्यंत लागू राहील अशा रीतीने त्यास मुदतवाढ देणे शासनास इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र सर्वसाधारण खंड अधिनियम (१९०४ चा १) याच्या कलम २१ सह, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ९ च्या उप कलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक मूवक. २०२६/प्र.क्र.२८/कराधान-१, दिनांक १४ मे २०२६ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

उक्त अधिसूचनेमध्ये, "१४ नोव्हेंबर २०२६" या अंकांऐवजी व शब्दाऐवजी "१४ एप्रिल २०२७" हे अंक व शब्द दाखल करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजय कंधारे,
शासनाचे उप सचिव.

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Murg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 12th November, 2026

NOTIFICATION

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. MVAT.2026/C.R.28/Taxation-1.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 9 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah.IX of 2005), the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Finance Department No. MVAT.2026/C.R. 28 / Taxation -1, Dated the 14th May 2026, amended the SCHEDULE 'B' appended to the said Act and has reduced the rate of tax on the Aviation Turbine Fuel (Duty paid) to seven per cent. for the period commencing from the 15th May 2026 and ending on the 14th November 2026;

And whereas, the Government considers it expedient to extend the said rate of tax on the Aviation Turbine Fuel (Duty paid) till the 14th April 2027.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 9 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah.IX of 2005) read with section 21 of the Maharashtra General Clauses Act (I of 1904) the Government of Maharashtra hereby amends the Government Notification, Finance Department No. MVAT.2026/C.R.28/Taxation-1, dated the 14th May 2026, as follows, namely :–

In the said Notification for the figures, letters and word "14th November 2026 ", the figures, letters and word "14th April 2027 " shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY KANDHARE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.